131

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA

Special Issue Vol - 02 September 2019

Impress
Impactful Policy Research in Social Science

Indian council of social science research

Government of India
Ministry of Human Resource Development

Sponsored

One Day Interdisciplinary National Level Seminar on

## SELF HELP GROUPS AND SOCIO-ECONOMIC EMPOWERMENT OF WOMEN

Friday, 27th September, 2019



Organized By

**Department of Economics**
Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's
**SHRI VYANKATESH ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**
Deulgaon Raja, Dist.Buldhana- 443 204.
NAAC Re-accredited at 'B' Level

Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Publication | September 2019 Special Issue 02 | 01

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Special Issue-02, September 2019

Indian council of social science research

Impress
Impactful Policy Research in Social Science

Government of India
Ministry of Human Resource Development

One Day Interdisciplinary National Level Seminar
on

# SELF HELP GROUPS AND SOCIO-ECONOMIC EMPOWERMENT OF WOMEN

Friday, 27th September, 2019

**Organized By**
Department of Economics
Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's

## SHRI VYANKATESH ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE

Deulgaon Raja, Dist.Buldhana- 443 204.
NAAC Re-accredited at 'B' Level

Editor
**Dr. Dnyaneshwar Gore**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication

September 2019
Special Issue 02

04

# Editorial Board & review Committee


- **Chief Editor**

**Dr Gholap Bapu Ganpat**
Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
9850203295, 7588057695
vidyawarta@gmail.com

- **M.Saleem**

saien Ghulam street
Fatehgarh Sialkot city
Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
saleem.1938@hotmail.com

- **Dr. Momin Mujtaba**

Faculty Member,Dept. of Business Admin.
Prince Salman Bin AbdulAziz University
Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**

115/478, Campus road,
Konesapuri, Nilaveli ( Postal code-31010),
Trincomalee, Sri Lanka
nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**

vikaspadalkar@gmail.com
**Cell.** +91 98908 13228 (India),
+ 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**

Navgan College, Parli –v Dist. Beed
Pin 431126 Maharashtra
Mobi.9421336952
umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**

B-2/8, Sukhwani Paradise,
Behind Hotel Ganesh, Pimpri,
Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**

Post.Warnanagar, Tq.Panhala,
Dist.Kolhapur-4316113
Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**

AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
Mob. No. – 09827983437
jubrajkhamari@gmail.com

- **Krupa Sophia Livingston**

289/55, Vasanthapuram,
ICMC, Chinna Thirupathy Post,
Salem- 636008 +919655554464
davidswbts@gmail.com

- **Dr. Wagh Anand**

Dept. Of Lifelong Learning and Extension
Dr B A M U Aurangabad pin 431004
Mobi. 9545778985
wagh.anand915@gmail.com

- **Dr. Ambhore Shankar**

Jalna,Maharashtra
shankar296@gmail.com
Mobi.9422215556

- **Dr. Ashish Kumar**

A-2/157, Sector-3, Rohini, Delhi -110085
*Ph.no:* 09811055359

- **Prof. Surwade Yogesh**

Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
**Cell No:** +919860768499
yogeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**

At.Post.Saundhane, Near
Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
Mobi. 9923811609
patildipak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**

Vanshree Nagar,Behind Hotel
Dawat, Mantha Road, Jalna-431203
Mobi.9422479302
**patwarivm@rediffmail.com**

- **Dr.Varma Anju**

Assistant Professor, Dept. of Education,
Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
anjuverma2009@rediffmail.com

- **Dr.Pramod Bhagwan Padwal**

Associate Professor,Department of Marathi
Banaras Hindu University,
Varanasi-221005.(Uttar Pradesh)
Mobi. 9450533466
pbpadwal@gmail.com




Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

134



36) बचत गट व महिला सक्षमीकरण
पुरुषोत्तम रंगराव चाटे, मोताळा ||136

37) जालना जिल्हयातील स्वयंसहायता बचत गट— एक दृष्टीक्षेप
डॉ. शिवाजी दत्तू आसाबे, बुलडाणा ||138

38) महिला सबलीकरणाची वाटचाल: एक अध्ययन
प्रा. डॉ. माधुरी अरविंद देशमुख, बुलडाणा ||142


39) स्वयंसहाय्यता गट — एक अभ्यास
डॉ. विष्णू एकनाथ गुमटकर, खामगांव ||146

40) ग्रामीण एवं शहरी महिलाओं के आर्थिक विकास में स्वर्ण जंयती अल्प ऋण ...
डॉ. श्वेता शर्मा, इन्दौर ||151

41) महिला सक्षमीकरण मे स्वयं सहाय्यता समुहों की भुमिका
प्रा. वाय. एस. राजपूत, बुलडाणा ||155

42) महिला सक्षमीकरणाची वाटचाल : एक अभ्यास
प्रा.डॉ.जितेंद्र पांडूरंगराव काळे, ता.मुखेड जि.नांदेड ||157

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com






For Principal
Shri Shivaji Arts, Commerce & Science College, Motala

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Publication | September 2019 Special Issue 02 | 0136

36

# बचत गट व महिला सक्षमीकरण

**पुरुषोत्तम रंगराव चाटे**
सहा प्राध्यापक, अर्थशास्त्र,
श्री शिवाजी महाविदयालय, मोताळा

**********

**सारांश :—**

महिला सक्षमीकरणाचा मुद्या अभ्यासतांना त्यांच्या असंख्य बाजू विचारात घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कौटूंबिक, आरोग्यविषयक, लोकसंख्या विषयक, सांस्कृतिक, विविध विकास निर्देशांक विषयक महिला सक्षमीकरण तपासून बघणे आवश्यक आहे. महिला सक्षमीकरणात सर्वात महत्त्वाचा मुद्या आर्थिक व शैक्षणिक आहे म्हणून शासनाच्या सहकार्याने विविध योजनाच्या माध्यमातून हे लक्ष्य साध्य होवू शकते. सुक्ष्म वित योजनेच्या माध्यतूान सक्षमीकरणाला नवसंजीवनी प्राप्त झाली आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिला उद्योग व्यवसायात स्वबळावर उभ्या राहिल्या पाहिजेत म्हणून शासन अनेक विध प्रकारची मदत करत आहे. आज बचत गटाच्या माध्यमातून अर्ध शहरी, ग्रामीण भाग, वाडया वस्त्यावरील महिला बोलक्या झाल्या आहेत. आर्थिक परिस्थितीमधून सावरण्यासाठी त्यांना शक्ती मिळत आहे. जिदद, मेहनत, धाडस व प्रामाणिक कष्ट करण्याची क्षमता या बळावर उद्योग व्यवसायातून महिलांना यशस्वीपणे समृध्दी खेचून आणता येवू शकते. स्त्री सक्षमीकरणाच्या कार्याची सुरुवात आपल्या देशामध्ये खऱ्या अर्थाने नवव्या पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून झाली. स्वयंसहाय्यता गट संघटित करुन उत्पादन कार्यात सहभागी स्त्रीयांचे संघटन हा महत्वपूर्ण टप्यांचा प्रारंभ होता. महिला बचत गट जगामधील प्रत्येक विकसनशील राष्ट्रांना एक संजीवनी म्हणून कार्य करत आहे. अनेकविध प्रकारच्या समस्या या माध्यमातून सुटत आहेत. भारत देशामध्ये वित्ताचा तुटवडा ही एक मोठी समस्या आहे. त्यामधून मार्ग काढण्यासाठी छोटया छोटया बचतीचे एकत्रीकरण करणे गरजेचे आहे. देशातील एकूण लोकसंख्येपैकी पन्नास टक्के महिला वर्ग आर्थिक साक्षर करणे, विकास कार्यात त्यांचा सहभाग वाढविणे व देशाच्या उत्पन्नात भर टाकणे हा मूळ हेतू सूक्ष्म वित्ताचा आहे.

**प्रस्तावना:**

आज भारत देशामध्ये नव्हे तर संपूर्ण जगामध्ये मग ते खेडयापाडयांपासून तर शहरापर्यंत महिलांनी स्वाभिमानाने जगण्याचे बळ बचतगटांच्या माध्यमातून प्राप्त झालेले आहे. महिलांच्या कार्यक्षमतेची, जीददीची व चिवटपणाची ही एक झलक आहे. महिला सक्षमीकरणची क्रांती ही नव्या तंत्रयंत्र युगात तिचं आत्मिक बळ वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे. सक्षमीकरणाची व्याख्याच करायची झाली तर, “महिला मधिल असलेल्या क्षमतांचा विस्तार व निवड करण्याचे स्वातंत्र्य. म्हणजे महिला सक्षमीकरण होय.” आर्थिक पाठबळ मिळाल्यावर जिदद व आत्मविश्वासाच्या जोरावर महिला यशस्वी होवू शकतात. हे बचत गटाच्या क्रांतीवरुन स्पष्टपणे अधोरेखीत झाले आहे. भारतासारख्या सांस्कृतिक भिन्न, धार्मिक भिन्न आणि रितीरिवाज भिन्न देशात बचत गटाच्या माध्यमातून क्रांती घडत आहे, ही सर्वात जास्त आश्चर्याची गोष्ट आहे. कारण वर्तमानकाळात सुध्दा काही समाजातील स्त्रियांना आज सुध्दा निर्णय व आर्थिक प्रक्रियेत समान स्थान देण्यावाचून असंख्य मतमतांतरे आहेत. जगामध्ये जागतिकीकरणाच्या अगोदरपासून महिला सक्षमीकरणाची लाट उसळलेली होती. त्यासाठी कालौधात अनेक चर्चासत्र, सेमिनार, व्याख्याने, जाहिरात बाजी या ठिकाणी सक्षमीकरणांचा मुद्या चर्चेला गेला. कुटूंबाचा विचार करता महिलांना दुय्यम प्रकारचे स्थान, ७० टक्के पेक्षा अधिक महिलांना आज सुध्दा निर्णय प्रक्रियेत मत मांडण्याचा अधिकार नाही. कृशी व कृशीपुरक उद्योगामध्ये महिला वर्गाचा मोलाचा वाटा असतो. मात्र त्यावर त्यांच्या मालकीचा आभाव. भारत देशामध्ये पंचायतराज चा विचार केला तर असंख्य महिला ग्राम पंचायत पासून ते जिल्हा परिषदामध्ये सदस्य व अध्यक्ष पदावर केवळ नामधारी म्हणून विराजमान आहेत. महिलांचे कुंटूंबाकरीता व



For
Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Publication | September 2019 Special Issue 02 | 0137

समाजाकरीताचे श्रम प्रामुख्याने विचारात घेतले तर तुलनात्मक दृश्टया महिला अग्रस्थानी आहेत. परंतू त्यांच्या श्रमाला समाज मान्यता नाही. त्याचप्रमाणे वेतन भेदाचा विचार केला तर महिलांना पुरुषांच्या तुलनेत कमी मूल्य प्राप्त होते.

**बचत गट व सक्षमीकरणाच्या विविध बाजू : निर्णय व आर्थिक प्रक्रियेतील स्थान उंचावत आहे.**

स्त्रियांविषयी पूर्वग्रह, चूकीच्या समजूती, धार्मिक पगडा, विवंचना, हेळसांड या कुप्रथांना मूठमाती देत माणूस म्हणून स्त्रीयांकडे पाहिले तर देशातील उत्पन्न, व्यवसाय व व्यवस्थेचा महिला प्रमुख आधार स्तंभ आहे. या वास्तवाची जाणीव बचत गटांच्या माध्यमातून झाली. ग्रामीण भागातील अधिका अधिक महिला बचत गटाच्या माध्यमातून आपला आर्थिक उन्नतीचा मार्ग निवडतांना दिसत आहेत. स्वयं सहाय्यता गट या संकल्पनेत महिलांच्या उन्नतीची, प्रगतीची, सन्मानाची निर्णयी व आर्थिक प्रक्रियेत सक्षम स्थान प्राप्त करुन देण्याची कुंजी आहे. आज बचत गटाच्या माध्यमातून महिला आर्थिक दृश्टीने सक्षम बनत आहे.

**कुटूंबातील उत्पन्नवाढीस हातभार :**

कुटूंब, समाज, गाव, राष्ट्र जर आर्थिकदृष्ट्या सक्षम करायचे असेल तर सर्वांच्या श्रमाचे मोल करणे अनिवार्य आहे. केवळ महिला आहे म्हणून त्यांना उपेक्षीत अथवा दुय्यम स्थान देवून चालणार नाही, म्हणून भारत देशात मागील तीन दशकात कौटूंबिक उत्पन्न वाढीस हातभार लावण्यासाठी महिलांनी बचत गट या आयुधाचा यशस्वीपणे वापर केलेला दिसत आहे. कारण आज स्पर्धेच्या युगात व वाढत्या महागाईत कौटूंबिक उत्पन्नास हातभार लावण्याचे सामर्थ्य महिलांना बचत गटाच्या माध्यमातून प्राप्त झाले आहे.

**संघटन कौशल्य व सभाषिटपणा वृध्दिंगत होत आहे**

बचत गटाच्या माध्यमातून संघटन वाढते व काटकसरीची सवय लागते. अडचणींच्या वेळेस तातडीच्या गरजा भागविण्यासाठी सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत नाही. त्वरीत व सुलभ कर्जासाठी महिलांना बचतीची सवय लागते. शिवाय अधिकोषणविषय कारभाराची माहिती होते. महिलांना चूल व मूल या परीघाबाहेर पडून नविन बाबी शिकण्याची संधी बचत गटाच्या माध्यमातून मिळत आहे. महिलांना बचत करणे, ती बचत उत्पादक कार्यात गुंतविणे, व्यावसाय उभारणी करणे, कर्ज घेणे, परतफेड करणे अशा आर्थिक व्यवहाराची माहिती होते व त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो. बचत गटामुळे महिलांमध्ये संघटन शक्ती निर्माण झाली आहे. ही चळवळ स्त्री शक्ती म्हणून समोर येत आहे.

**जीवनमानात सुधारणा :**

प्रत्येक राष्ट्राच्या विकासामध्ये त्या राष्ट्रातील सामाजिक स्वास्थ कसे आहे, यावर गुणवत्तापूर्ण विकास अवलंबून असतो. भारत देशामध्ये अनेकविध प्रथा व परंपरा होत्या आणि आहेत. परंतू वर्तमानकाळात साक्षरता आणि सुधारणा हया दोन्ही गोष्टीची सांगड बसलेली आहे. म्हणून सुधारणा करण्यासाठी वित्ताची जोड हवी आणि त्यासाठी सामूहिक कृती करण्याची आवश्यकता म्हणून स्वंय सहाय्यता गटाची निर्मिती विशेषत: महिला वर्गाच्या जीवनमानात या गटाच्या माध्यमातून अमूलाग्र बदल झालेले आहेत.महिला वर्गाला आर्थिक संपन्नता प्राप्त करुन देण्यासाठी बचत गट नवसंजीवनी ठरत आहे.

**वित्तीय साक्षरता :**

साक्षरतेचे आज अनेक उपप्रकार उदयास आले आहे किंबहूना साक्षरतेची परिभाषा बदलत आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण केवळ लिहता वाचता येणे म्हणजे साक्षर इतका संकुचित अर्थ साक्षरतेचा नाही, त्याला सोबत आरोग्य, वित्त, तंत्रज्ञान इत्यादी असंख्य बाबी जोडलेल्या आहेत. बचत गटांच्या माध्यमातून पैसा अथवा वित्त यांचे महत्व समजण्यास मदत झाली विशेषत: महिला वर्गामध्ये या विषयी जास्त जाणीव जागृती निर्माण झाली. या प्रक्रियेमध्ये पैसा देवाण घेवाण, कर्ज प्राप्ती, परतफेड, व्यवसाय स्थापना, उत्पादन, विक्री, व्यवहार करण्याची पध्दती, अधिकोषणाची माहिती इत्यादी असंख्य बाबींची माहिती झाल्यामुळे बचत गट वित्तीय साक्षरतेचा एक भाग बनत असलेला दिसतो.

**भ्रष्टाचाराच्या प्रमाणात घट :**

महिला वर्गामध्ये सुरुवातीपासूनच प्रामाणिकपणा,



Principal
Shri Shivaji Arts,Commerce & Science College,Motala

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Publication | September 2019 Special Issue 02 | 0138

कर्तव्यदक्षता, संयम, सचोटीने कार्य करण्याचे गुणधर्म जन्मजात असल्याचे सप्रमाण सिध्द झाले आहे. त्यामुळे स्वयं सहाय्यता गटाच्या माध्यमातून त्यांनी नविन क्रांती घडविण्याच्या दिशेने मार्गक्रमण केले आहे आणि ते म्हणजे भ्रष्टाचाराला पायबंद. कारण बहुतांश क्षेत्रामध्ये महिला ज्या – ज्या ठिकाणी उच्चपदस्थ क्षेत्रावर कार्यरत आहे, त्या ठिकाणी तुलनात्मकरित्या भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी आहे. बचत गटामध्ये महिला वर्ग भ्रष्टाचार मुक्त या न्यायीक तत्वाचा तंतोतंत पालन करतांना दिसतात. कारण आज भारत देशामध्ये एकूण १,१७,७७७ इतके बचत गट २०१५ च्या आकडेवारीनुसार कार्यरत आहेत. त्यामध्ये गैरमार्गाचा अवलंब किंवा भ्रष्टाचार याबददल साशंकता अतिशय कमी आहे.

**संदर्भग्रंथ:**


१. बचत गटांच्या माध्यमातून गरीबीमुक्त विश्वाची निर्मिती, डॉ. मोहमंद युनूस अनुवाद गोविंद गोडबोले २००९

२. बचत गट आणि सूक्ष्मवित्त, एन. ललिथा, डोमीनंन्ट पब्लिकेशन, नवी दिल्ली.

३. ग्रामीण भारताचा विकास, पी. गोपीनाधन, पॉईन्टर पब्लिकेशन जयपूर.

४. योजना ऑक्टोंबर २००८

५. इंटरनेट, वर्तमानपत्र, लेख.


❑❑❑

**37**

# जालना जिल्हयातील स्वयंसहायता बचत गट– एक दृष्टीक्षेप


**डॉ. शिवाजी दत्तू आसाबे**

समुपदेशक, जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना

सचिव, सेवार्थ सोशल वर्क मल्टीपर्पज फाउंडेशन, चिखली, जिल्हा. बुलडाणा


**********


**गोषवारा:–**

भारतातील ग्रामीण भागातील दारिद्र निर्मुलनासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानाची सुरवात केली आहे. देशातील गरीब हा गरिबीतून बाहेर पडू शकतो त्यासाठी त्यास आवश्यक साहाय्य दिले गेले पाहिजे. या दृढ विश्वासातून गरिबांनी गरीबांसाठीच्या संस्था निर्माण करून त्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरिबांच्या कौटुंबिक उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कुशल त्याचबरोबर प्रभावी व्यासपीठ देण्यात येते. यामध्ये उत्पन्न वाढीसाठी पायाभूत व शाश्वत उपजीविकेच्या पर्यायांचा अंतर्भाव आहे. तसेच वित्तीय आणि सार्वजनिक सेवेचा विस्तार ग्रामीण भागातील गरीब आणि दुर्लक्षित लोकांपर्यंत हा उपक्रम भर देतो.


**प्रस्तावना:–**

भारतीय समाजातील मध्यमवर्गीय, दुर्बल घटकांना एक आशेचा किरण म्हणून स्वयंसहाय्यता बचत गटाकडे पहिले जाते. देशातील लाखो महिलांच्या आर्थिकच नाही तर समग्र भवितव्याला व्यवस्थित आकार देण्याचे काम बचत गटाच्या रूपाने सुरु आहे. बचत गट म्हणजे महिला सक्षमीकरणाची दिशा असे सर्वसमावेशक सूत्र मान्य होत आहे. अशा महत्वाच्या टप्प्यावर बचत गटाच्या विकासाच्या सद्यस्थिती बरोबरच इतिहासाचा सुद्धा मागोवा घेणे या अध्ययनात गरजेचे आहे. भारताबरोबरच जगामध्ये स्वयंसहायता बचत



Principal
Shri Shivaji Arts, Commerce & Science College, Motala

Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's

# SHRI VYANKATESH ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE

Deulgaon Raja, Dist. Buldana - 443204

NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL

Indian Council of Social Science Research

The Ministry of Human Resource Development (MHRD) & Indian Council of Social Science Research (ICSSR)
(under the Scheme IMPRESS - Impactful Policy Research in Social Science) Sponsored

## One Day Interdisciplinary National Level Seminar

**"Role and Significance of Self Help Groups (shgs) In Socio-economic Empowerment Of Women: Opportunities, Issues and Approaches"**

# CERTIFICATE

*This is to certify that,* पुरुषोत्तम रंगराव चाटे, सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र, श्री. शिवाजी महाविद्यालय, मोताळा *attended the One Day Interdisciplinary National Level Seminar on* **"Role and Significance of Self Help Groups (SHGs) in Socio-economic Empowerment of Women: Opportunities, Issues and Approaches"** *and participated in the deliberations on 27th September, 2019. He also presented a research paper entitled* बचतगट व महिला सक्षमीकरण

Place : Deulgaon Raja

Date : 27th September, 2019

Coordinator
(Dr. Dnyaneshwar Gore)

Convener
(Prin.Dr. Gajanan Jadhav)

For Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,Motala

138